**परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेच्या सभासदाचा सेवाकालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटूंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदान व लाभाबाबत....**

**अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालये व संस्था इ.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१९७/१९/विशि-१**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १८.०८.२०२१

**वाचा:-**

१. **वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४, दि.२९.०९.२०१८.**
२. **उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एनपीएस-२०१९/प्र.क्र.३६६/१९/विशि-१, दि.१७.०३ २०२१**

**प्रस्तावना:-**

वित्त विभागाने संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या दि.०१.११.२००५ वा त्यानंतर रूजू झालेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचा त्यांची सेवा १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वी मृत्यू झाल्यास संदरहू कर्मचाऱ्यांने नामनिर्देशीत केलेल्या अथवा त्याच्या कायदेशीर वारसदारास रू.१० लक्ष इतके सानुग्रह अनुदान लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच सदरहू शासन निर्णयातील तरतुदी जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक शाळा, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित असलेली अशासकीय अनुदानित महविद्यालये तसेच कृषि विद्यापीठे व तत्सम अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारांसह लागू केलेल्या आहेत. मात्र याबाबत संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने स्वतंत्र आदेश निर्गमित करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

वित्त विभागाने दिलेल्या सूचनांनुसार सदरहू योजना विभागाच्या अधिनस्त असलेली अकृषि विद्यापीठे, संलग्नित मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने तसेच सेवानिवृत्तीवेतन योजना लागू असलेली शासकीय अनुदानित अभिमत विद्यापीठे यातील १०० टक्के अनुदानित पदावर दि.०१.११.२००५ रोजी वा त्यानंतर रूजू झालेल्या व १० वर्षे सेवा पूर्ण होण्यापूर्वी मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्याने नामनिर्देश केलेल्या अथवा त्यांच्या कायदेशीर वारसास रु.१० लक्ष सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

दि.०१.११.२००५ रोजी वा त्यानंतर विभागाच्या अधिनस्त असलेली अकृषि विद्यापीठे, संलग्नित मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने तसेच अनुदानित अभिमत विद्यापीठे यातील १०० टक्के अनुदानित पदावर नियुक्त झालेल्या व परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणारा कर्मचारी १० वर्षे सेवा होण्यापूर्वी सेवेत असताना मृत्यू पावल्यास, त्याच्या नामनिर्देशीत व्यक्तीस, नामनिर्देशन केले

नसल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रू.१० लक्ष एवढे सानुग्रह अनुदान अधिक कर्मचाऱ्याच्या खाती जमा असलेली संचित रक्कम देण्यात यावी.

२. दि.०१.११.२००५ रोजी व त्यानंतर अकृषि विद्यापीठे, संलग्नित मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने तसेच अनुदानित अभिमत विद्यापीठे यातील १०० टक्के अनुदानित पदावर नियुक्त झालेला कर्मचारी जर परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य होण्यास पात्र असेल. परंतु त्याचे खाते उघडण्याची जबाबदारी ज्या कार्यालयाची आहे, त्या कार्यालयांनी ती पार पाडली नसेल किंवा सदर कर्मचाऱ्याचा दोष नसतांना काही अपरिहार्य कारणास्तव त्याचे खाते उघडले गेले नसेल, तर अशा कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस, नामनिर्देशन केले नसल्यास त्याच्या कायदेशीर वारसास देखील रु.१० लक्ष इतके सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील. मात्र अशा प्रकरणांना मान्यता देण्यापूर्वी वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक असेल.

३. या शासन निर्णयाद्वारे अनुज्ञेय होणाऱ्या सानुग्रह अनुदानाचा लाभ-

अ) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्याचा सेवेत असताना १० वर्षे सेवा पूर्ण होण्यापूर्वी मृत्यु झाल्यास, त्या कर्मचाऱ्याने नामनिर्देशित केलेली व्यक्तीस अथवा,

ब) जर त्या कर्मचाऱ्याने नामनिर्देशन केले नसेल तर त्याच्या कायदेशीर वारसास अनुज्ञेय राहील.

४. या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय ठरणारे सानुग्रह अनुदान मंजूरीचे अधिकार प्रशासकीय विभाग प्रमुख या नात्याने अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना राहतील.

५. सदर योजनेची कार्यपध्दती सोबत जोडलेल्या **"जोडपत्र"** व **परिशिष्ट क्र.१ ते ५** प्रमाणे अंमलात आणावी.

६. या प्रयोजनार्थ येणारा खर्च पुढील लेखाशीर्षाखाली नमूद केलेल्या तरतूदीतून करण्यात यावा.

| लेखाशीर्ष | मराठी नाव | इंग्रजी नाव |
|---|---|---|
| मागणी क्र. | जी-६ | G-6 |
| मुख्य लेखाशीर्ष | २०७१- निवृत्तीवेतने व इतर सेवानिवृत्ती लाभ | 2071- Pensions and other Retirement benefits |
| उपमुख्य लेखाशीर्ष | ०१- नागरी | 01- Civil |
| गौण शीर्ष | १०३-अनुकंपा भत्ते | 103-compassionate Allowance |
| गट शीर्ष | ००- | 00- |
| उपशीर्ष | (००) (११) अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालये व संस्थांमधील कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत सानुग्रह अनुदान (अनिवार्य) | (00) (11) Defined Contriutory//National Pension Scheme Ex-gratia, for employees of Non Agricultural Universities and Affiliated Non Government Aided Colleges and Institutions (Committed) |
| उद्दिष्ट | ०४ (निवृत्तीवेतन विषयक खर्च) | Pensionary Charges |
| संगणक संकेतांक | २०७१०७८५ | 20710785 |

७. हा शासन निर्णय मा. महालेखापाल कार्यालयाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.सं.ख.वि./चा-१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग/यू ओ आर-३८/२०२१-२२/१६५, दि.०६.०७.२०२१ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार तसेच वित्त विभागाच्या दि.२९.०९.२०१८च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०८१८१८१२४१५९०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

DHIRAJ KANTILAL ABHANG

Digitally signed by DHIRAJ KANTILAL ABHANG
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=b12b9d4aa7eeb9ffa769b94e214788be4cabe839cedddf6d85e5013d70af3059, pseudonym=97D6B6AF16C58D84AAAF110029FACC9F0C78C36B, serialNumber=F8E3F09FD607FF641475EAA0DB52B67C291D2CF621FCAB2188FE9BAB478FF04C, cn=DHIRAJ KANTILAL ABHANG
Date: 2021.08.18 17:19:58 +05'30'

**(धीरज अभंग)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ व २ महाराष्ट्र राज्य/मुंबई/नागपूर,
४. मा. महालेखापाल (लेखा व परीक्षा) १ व २ महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर,
५. मा. कुलगुरू सर्व अकृषि विद्यापीठे,
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई,
९. संचालक, लेखा व कोषागारे,
१०. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण,
११. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. अवर सचिव, वित्त विभाग (सेवा -४/सेवा-९ कोषा-५/व्यय-५) मंत्रालय, मुंबई,
१६. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१७. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१८. निवडनस्ती (विशि-१)

**(शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१९७/विशि-१,दि.१८.०८.२०२१ मध्ये निर्दिष्ट केलेले जोडपत्र)**

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणारा अकृषि विद्यापीठे, संलग्नित मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने तसेच सेवानिवृत्तीवेतन योजना लागू असलेली शासकीय अनुदानित अभिमत विद्यापीठे यातील १०० टक्के अनुदानित पदावरील कर्मचारी १० वर्ष सेवा होण्यापूर्वी सेवेत असतांना मृत्यू पावल्यास त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस / कायदेशीर वारसास सानुग्रह अनुदान रुपये १० लक्ष मंजूर करण्यासंदर्भात करावयाची कार्यवाही.

१. **कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने / कायदेशीर वारसाने करावयाची कार्यवाही:-** परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याचा १० वर्ष सेवा होण्यापूर्वी सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्या कर्मचाऱ्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने किंवा जर त्या कर्मचाऱ्याने नामनिर्देशन केले नसेल, तर कायदेशीर वारसाने कर्मचाऱ्याच्या मूळ मृत्यू प्रमाणपत्रासह सानुग्रह अनुदान रुपये १० लक्ष मिळण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव/महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्याकडे सोबतच्या विहित नमुन्यात (परिशिष्ट-१) मध्ये अर्ज सादर करावा.

२. **संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव/महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी करावयाची कार्यवाही :-** विद्यापीठाचे कुलसचिव/महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी मृत कर्मचाऱ्याच्या नामर्देशित व्यक्ती / कायदेशीर वारसाचा मूळ अर्ज परिशिष्ट-१, मूळ मृत्यू प्रमाणपत्र, सेवापुस्तकाचे प्रथम पान तसेच प्रथम नियुक्तीची नोंद असलेल्या पानाची सांक्षाकित प्रत, डिसीपीएस/एनपीएस क्रमांक, विद्यापीठ/महाविद्यालय सेवेतील नियुक्तीचे सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेश यासह या सोबतच्या परिशिष्ट-२ मधीत विहित नमुन्यात संबंधित विभाग सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांच्याकडे शिफारशीसह प्रस्ताव सादर करावा.

३. **संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी करावयाची कार्यवाही :-** संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांच्याकडून परिशिष्ट-२ च्या नमुन्यातील प्राप्त झालेला प्रस्ताव तपासून व त्यासोबत जोडलेले दस्तऐवज बरोबर असल्याची खात्री करून सोबत जोडलेल्या परिशिष्ट-३ मधील विहित नमुन्यात संचालक, उच्च शिक्षण/तंत्रशिक्षण यांच्याकडे शिफारशींसह प्रस्ताव सादर करावा.

४. **संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी करावयाची कार्यवाही :-** संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांच्याकडून प्राप्त झालेला प्रस्ताव तपासून व सोबत जोडलेले दस्तऐवज बरोबर असल्याची खात्री करून यासोबतच्या परिशिष्ट-४ मधील विहित नमुन्यात प्रशासकीय विभाग प्रमुखाकडे शिफारशींसह प्रस्ताव सादर करा.

५. **प्रशासकीय विभाग प्रमुखाने करावयाची कार्यवाही :-** संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांच्याकडून परिशिष्ट-४ मधील विहित नमुन्यातील प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्या सोबतचे दस्ताऐवज / प्रमाणपत्रे इत्यादींचे आधारे खात्री करुन सोबतच्या परिशिष्ट-५ मध्ये प्रशासकीय विभाग प्रमुख सानुग्रह अनुदान मंजुरीचे आदेश निर्गमित करतील. आदेशाची एक प्रत संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, दुसरी प्रत संबंधित विद्यापीठाचे कुलगुरू/महाविद्यालयाचे प्राचार्य यांना पाठवावी. तिसरी प्रत संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांना पाठवावी. तसेच चौथी प्रत (स्वाक्षरीत) कर्मचाऱ्याच्या वारसास पाठविण्यात यावी व पाचवी प्रत (कार्यालयीन प्रत) प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी त्यांचे कार्यालयीन अभिलेख्यात जतन करावी.

६. संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण मंजूरी आदेशाच्या आधारे कोषागारास देयक सादर करतील. सदर देयक नमुना महाराष्ट्र कोषागार नियम ४५-ए मध्ये सादर करण्यांत यावे.

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत प्रदान करण्यात येणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम खालील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

| लेखाशीर्ष | मराठी नाव | इंग्रजी नाव |
|---|---|---|
| मागणी क्र. | जी-६ | G-6 |
| मुख्य लेखाशीर्ष | २०७१- निवृत्तीवेतने व इतर सेवानिवृत्ती लाभ | 2071- Pensions and other Retirement benefits |
| उपमुख्य लेखाशीर्ष | ०१- नागरी | 01- Civil |
| गौण शीर्ष | १०३-अनुकंपा भत्ते | 103-compassionate Allowance |
| गट शीर्ष | ००- | 00- |
| उपशीर्ष | (००) (११) अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालये व संस्थांमधील कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत सानुग्रह अनुदान (अनिवार्य) | (00) (11) Defined Contriutory//National Pension Scheme Ex-gratia, for employees of Non Agricultural Universities and Affiliated Non Government Aided Colleges and Institutions (Committed) |
| उद्दिष्ट | ०४ (निवृत्तीवेतन विषयक खर्च) | Pensionary Charges |
| संगणक संकेतांक | २०७१०७८५ | 20710785 |

**********************

## परिशिष्ट-१

**परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणारा अकृषि विद्यापीठे, संलग्नित मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने तसेच सेवानिवृत्तीवेतन योजना लागू असलेली शासकीय अनुदानित अभिमत विद्यापीठे यातील १०० टक्के अनुदानित पदावरील कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने/वारसाने सानुग्रह अनुदान मागणीबाबत करावयाचा अर्ज.**

कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्ती/वारसाचे नाव व पुर्ण पत्ता:-
--------------
दिनांक :--------------------

प्रति,

कुलसचिव/प्राचार्य,
विद्यापीठाचे/महाविद्यालयाचे नाव

विषय:-परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदान मिळणेबाबत.

महोदय,

१) कै. श्री./ श्रीमती ------------------------------हे / ह्या राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ------------ ते ------------ कार्यरत होते/ होत्या. सेवेत असतांना दिनांक----------रोजी त्यांचे निधन झाले आहे. सेवेत असतांना ते/ त्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेत योजनेचे सभासद होते/ होत्या.

त्यांनी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योतना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत रक्कम मिळण्यासाठी मला नामनिर्देशित केले आहे/ नाही. (नसल्यास -------------मी त्यांचा कायदेशीर वारस ठरत आहे.) त्यामुळे उपरोक्त या योजनेअंतर्गत देय केलेले सानुग्रह अनुदान मिळावे, ही विनंती. यासोबत मी कै. श्री/ श्रीमती----------- --------यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मुळ प्रत जोडत आहे. त्यांचेशी माझे नाते पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | मयत कर्मचाऱ्याशी नाते |
|---|---|---|
| | | |

२) कर्मचाऱ्याचा आवश्यक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| कर्मचाऱ्यांचे नांव | सेवार्थ आयडी/DCPS क्रमांक/ PRAN क्रमांक | सेवेत रुजु झाल्याची तारीख |
|---|---|---|
| | | |

सोबत :- १) मृत्यूचा दाखला (मुळ प्रत)
२) वारस प्रमाणप्रत्र

स्थळ :-
दिनांक :-

आपला/आपली विश्वासू,

## परिशिष्ट-२

**कुलसचिव/महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणारा अकृषि विद्यापीठे, संलग्नित मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने तसेच सेवानिवृत्तीवेतन योजना लागू असलेली शासकीय अनुदानित अभिमत विद्यापीठे यातील १०० टक्के अनुदानित पदावरील कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने/वारसाने सानुग्रह अनुदान मागणीबाबत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांच्याकडे करावयाचा अर्ज.**

कार्यालयाचे नाव व पत्ता:-------------------------
---------------------------------------------
---------------------------------------------
दिनांक:- ---------------------

प्रति,

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण
---------------------------------

विषय:- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत सभासदाच्या नामनिर्देशित व्यक्तीस/ कायदेशीर वारसास सानुग्रह अनुदान मंजुर करण्याबाबत.

महोदय,

या कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी श्री/ श्रीमती --------------------------यांचे दिनांक ---------- रोजी निधन झाले. सदर कर्मचारी राज्य शासनाच्या सेवेत असतांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना या योजनेचे सभासद होते. उपरोक्त कारणामुळे कर्मचाऱ्याची सेवा संपुष्टात आल्यामुळे शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४ दि. सप्टेंबर,२०१८ अनुसार सानुग्रह अनुदान मिळणेबाबत त्यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचा/ नामनिर्देशन नसल्याने कायदेशीर वारसदाराचा अर्ज प्राप्त झालेल्या आहे. त्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्याचा तपशील पुढीलप्रमाणे सादर करण्यास येत आहे.

| नांव, पदनाम | सेवार्थ आयडी/ DCPS क्रमांक/ PRAN क्रमांक | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | मृत्यू दिनांक | मृत्यूच्या दिनांकास झालेली सेवा/ वर्षे/ महिना /दिवस | कोषागाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

यासोबत खालील नमुद केल्याप्रमाणे आवश्यक दस्ताऐवज सादर करण्यात येत आहे.

१) नामनिर्देशित व्यक्ती/ कायदेशीर वारसदाराचा अर्ज-परिशिष्ट-१ (मुळ प्रत)
२) मृत्यूचा दाखला (मुळ प्रत)
३) वारस प्रमाणपत्र (मुळ प्रत)
४) कर्मचाऱ्यांच्या शासन सेवेतील नियुक्ती आदेशाची सांक्षाकित प्रत

५) कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकाचे प्रथम पान तसेच प्रथम नियुक्तची नोंद असलेल्या पानाची सांक्षाकित प्रत

६) डिसीपीएस/ एनपीएस सभासद असल्याचे प्रमाणपत्र

७) कर्मचाऱ्याकडुन शासकीय येणे बाकी नसल्याचे प्रमाणपत्र

तरी, सदर नामनिर्देशित व्यक्ती/ नामनिर्देशन नसल्याने कायदेशीर वासर श्री/ श्रीमती ------------------------------यांना रु. १० लक्ष सानुग्रह अनुदान मिळण्यास शिफारस आहे.

सहपत्रः- वरीलप्रमाणे.

आपला/आपली, विश्वासू

(कुलसचिव/ प्राचार्य)

## परिशिष्ट-३

**विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणारा अकृषि विद्यापीठे, संलग्नित मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने तसेच सेवानिवृत्तीवेतन योजना लागू असलेली शासकीय अनुदानित अभिमत विद्यापीठे यातील १०० टक्के अनुदानित पदावरील कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने/वारसाने सानुग्रह अनुदान मागणीबाबत संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांच्याकडे करावयाचा अर्ज**.

कार्यालयाचे नाव व पत्ता:-------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

दिनांक:- ---------------------

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण

---------------------------------

विषय:- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत सभासदाच्या नामनिर्देशित व्यक्तीस/ कायदेशीर वारसास सानुग्रह अनुदान मंजुर करण्याबाबत.

महोदय,

या कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी श्री/ श्रीमती -------------------------यांचे दिनांक ---------- रोजी निधन झाले. सदर कर्मचारी राज्य शासनाच्या सेवेत असतांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना या योजनेचे सभासद होते. उपरोक्त कारणामुळे कर्मचाऱ्याची सेवा संपुष्टात आल्यामुळे शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४ दि. सप्टेंबर,२०१८ अनुसार सानुग्रह अनुदान मिळणेबाबत त्यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचा/ नामनिर्देशन नसल्याने कायदेशीर वारसदाराचा अर्ज प्राप्त झालेल्या आहे. त्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्याचा तपशील पुढीलप्रमाणे सादर करण्यास येत आहे.

| नांव, पदनाम | सेवार्थ आयडी/ DCPS क्रमांक/ PRAN क्रमांक | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | मृत्यू दिनांक | मृत्यूच्या दिनांकास झालेली सेवा/ वर्षे/ महिना /दिवस | कोषागाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

यासोबत खालील नमुद केल्याप्रमाणे आवश्यक दस्ताऐवज सादर करण्यात येत आहे.

१. नामनिर्देशित व्यक्ती/ कायदेशीर वारसदाराचा अर्ज-परिशिष्ट-१ (मुळ प्रत)
२. मृत्यूचा दाखला (मुळ प्रत)
३. वारस प्रमाणपत्र (मुळ प्रत)

४. कर्मचाऱ्यांच्या शासन सेवेतील नियुक्ती आदेशाची सांक्षाकित प्रत
५. कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकाचे प्रथम पान तसेच प्रथम नियुक्तची नोंद असलेल्या पानाची सांक्षाकित प्रत
६. डिसीपीएस/ एनपीएस सभासद असल्याचे प्रमाणपत्र
७. कर्मचाऱ्याकडुन शासकीय येणे बाकी नसल्याचे प्रमाणपत्र

तरी, सदर नामनिर्देशित व्यक्ती/ नामनिर्देशन नसल्याने कायदेशीर वासर श्री/ श्रीमती ------------------------------यांना रु. १० लक्ष सानुग्रह अनुदान मिळण्यास शिफारस आहे.

सहपत्रः- वरीलप्रमाणे.

आपला/आपली, विश्वासू

(विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण)

## परिशिष्ट-४

**संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणारा अकृषि विद्यापीठे, संलग्नित मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने तसेच सेवानिवृत्तीवेतन योजना लागू असलेली शासकीय अनुदानित अभिमत विद्यापीठे यातील १०० टक्के अनुदानित पदावरील कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने/वारसाने सानुग्रह अनुदान मागणीबाबत प्रशासकीय विभाग प्रमुख यांच्याकडे करावयाचा अर्ज.**

कार्यालयाचे नाव व पत्ता:-----------------------
---------------------------------------------
---------------------------------------------
दिनांक:- ---------------------

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

विषय:- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत सभासदाच्या नामनिर्देशित व्यक्तीस/ कायदेशीर वारसास सानुग्रह अनुदान मंजुर करण्याबाबत.

महोदय,

या कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी श्री/ श्रीमती ---------------------------यांचे दिनांक ---- ------ रोजी निधन झाले. सदर कर्मचारी राज्य शासनाच्या सेवेत असतांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना या योजनेचे सभासद होते. उपरोक्त कारणामुळे कर्मचाऱ्याची सेवा संपुष्टात आल्यामुळे शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४ दि. सप्टेंबर,२०१८ अनुसार सानुग्रह अनुदान मिळणेबाबत त्यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचा/ नामनिर्देशन नसल्याने कायदेशीर वारसदाराचा अर्ज प्राप्त झालेल्या आहे. त्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्याचा तपशील पुढीलप्रमाणे सादर करण्यास येत आहे.

| नांव, पदनाम | सेवार्थ आयडी/ DCPS क्रमांक/ PRAN क्रमांक | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | मृत्यू दिनांक | मृत्यूच्या दिनांकास झालेली सेवा/ वर्षे/ महिना /दिवस | कोषागाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

यासोबत खालील नमुद केल्याप्रमाणे आवश्यक दस्ताऐवज सादर करण्यात येत आहे.

१. नामनिर्देशित व्यक्ती/ कायदेशीर वारसदाराचा अर्ज-परिशिष्ट-१ (मुळ प्रत)
२. मृत्यूचा दाखला (मुळ प्रत)
३. वारस प्रमाणपत्र (मुळ प्रत)

४. कर्मचाऱ्यांच्या शासन सेवेतील नियुक्ती आदेशाची सांक्षाकित प्रत
५. कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकाचे प्रथम पान तसेच प्रथम नियुक्तची नोंद असलेल्या पानाची सांक्षाकित प्रत
६. डिसीपीएस/ एनपीएस सभासद असल्याचे प्रमाणपत्र
७. कर्मचाऱ्याकडुन शासकीय येणे बाकी नसल्याचे प्रमाणपत्र

तरी, सदर नामनिर्देशित व्यक्ती/ नामनिर्देशन नसल्याने कायदेशीर वासर श्री/ श्रीमती -------------------------------यांना रु. १० लक्ष सानुग्रह अनुदान मिळण्यास शिफारस आहे.

सहपत्र:- वरीलप्रमाणे.

आपला/आपली, विश्वासू

(संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण)

परिशिष्ट-५

क्रमांक.........

कार्यालयाचे नाव व पत्ता:----------------------

दिनांक:---------------------------------------

वाचा:-

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४, दि. सप्टेंबर,२०१८.

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१९७/१९/विशि-१ दि........

३) संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांच्याकडून प्राप्त झालेला दिनांक ------------- रोजीचा सानुग्रह मंजुरीचा प्रस्ताव.

४) कर्मचाऱ्याचे नाव ------------------यांचे नामनिर्देशित व्यक्ती/ कायदेशीर वारसदार श्री/ श्रीमती --------------------यांचा परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदान मिळण्याकरीता प्राप्त झालेला दिनांक ------- रोजीचा अर्ज.

आदेश

उपरोक्त क्रमांक २ अन्वये -----------------------------यांच्या कडून प्राप्त झालेल्या प्रस्तावासोबत श्री/श्रीमती --------------------यांच्या क्रमांक ४ येथे नमूद केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने प्रशासकीय विभाग प्रमुख हे त्यांना संदर्भ क्रमांक १ येथील वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:- अनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४, दि. सप्टेंबर,२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, श्री/ श्रीमती--------------------------यांच्या नामनिर्देशित व्यक्तीस/ नामनिर्देशित नसल्याने कायदेशीर वारसास श्री/श्रीमती -------------------------- यांना सानुग्रह अनुदान रुपये १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) मंजूर करीत आहेत.

२. सदर " सानुग्रह अनुदान" शासकीय कर्मचारी कर्मचारी सेवेत असताना १० वर्ष शासन सेवा होण्यापूर्वी दिनांक ---------रोजी मृत्यू पावल्यामुळे मंजुर करण्यात येत आहे. सदर आदेश आदेशाच्या दिनांकापासून १ वर्ष कालावधीसाठी ग्राह्य राहतील.

३. सदरचा खर्च " मागणी क्र. जी-........................... या लेखाशीर्षखाली खर्ची टाकण्यात यावा.

स्वाक्षरी

प्रशासकीय विभाग प्रमुख

प्रत:-

१. जिल्हा कोषागार अधिकारी ................

२. कुलसचिव/प्राचार्य (विद्यापीठे/महाविद्यालयाचे नाव व पत्ता)

३. संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण.....

४. श्री./श्रीम........... यांना माहितीस्तव.

५. निवड नस्ती (......)

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA

Affiliation T-1 Section (0231) 2609089 , 2609136 & 2609146

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र

(संलग्नता टी-१ विभाग ☎ २६०९०८९,२६०९१३६ व २६०९१४६)

Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

East:1962
A++ Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ/संलग्नता टी.१/ प्रशांत/ 860 No 00519 दिनांक- 24 AUG 2021

प्रति,

प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालये यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

आपला विश्वासू,

( एम.पी.कदम )

उपकुलसचिव

संलग्नता टी.१ विभाग